दै. देशोन्नती दि. 14.10.25

# रेती उपसा करून पलायन केलेले आरोपी व इंजिन ड्रोनच्या सहाय्याने ताब्यात

## नांदेड ग्रामीण पोलिसांची वाळू माफियांविरुद्ध मोठी कारवाई ; १ कोटींचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड** : पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली वाळू माफियांविरुद्ध कारवाई करण्यासाठी कंबर कसलेल्या नांदेड ग्रामीण पोलिसांनी आता चक्क पलायन केलेल्या आरोपीसह लपवून ठेवलेले इंजिन ड्रोनच्या माध्यमातून ताब्यात घेतले असून या कारवाईत सुमारे १ कोटी ३९ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी १९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या सततच्या कारवाईमुळे वाळू माफियांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोनि ओमकांत चिंचोलकर यांना १३ नोव्हेंबर रोजी गोदावरी नदीपात्रात चोरुन लपुन अवैध रेती उपसा होत असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पथकाने सापळा लावुन १३ नोव्हेंबर रोजी पहाटे ४ वाजता बोट, डीझेल, पेट्रोल, ड्रोन व इतर आवश्यक साहीत्यासह गोदावरी नदीपात्रात कल्लाळ या ठिकाणावर उत्तरले व बोटीच्या सहाव्याने काळेश्वर, विष्णुपुरी, मार्कड, पिंपळगाव, भंगी, वाहेगाव, गंगावेट कल्लाळ या ठिकाणी जाऊन छापा कारवाई केली. सदर ठिकाणी गोदावरी नदी पात्रातुन इंजीन बोट, तराफे, खोरे, फावडे मजुराच्या सहाय्याने रेती चोरी करत होते. त्या ठिकाणी जावून मुद्देमाल बाहेर काढणे शक्य नसल्याने तो जाळून बुडवून नष्ट केला. यावेळी काही आरोपी पोलीसांना पाहून पळून जाऊन शेतात लपले होते. त्यांना ड्रोनचा वापर करुन पकडुन ताब्यात घेतले तर काही इंजीन लपवुन ठेवले होते ते ड्रोनच्या सहाय्याने शोधून जप्त केले. या कारवाईत पोलिसांनी १ कोटी ३९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन कारवाई करण्यात आली आहे. यातील आरोपीतांपैकी ९ बिहारी मजुर व १० मुख्य मालक यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून १० जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाई पथकात उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि ओमकांत चिंचोलकर, पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड, कुसमे, पोहेकॉ केंद्रे, अर्जुन मुंडे, पचलिंग, कल्याणकर यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांचा समावेश होता.



**आरोपींमध्ये यांचा समावेश**

या कारवाईत पोलिसांनी गणेश जाधव, मुन्ना चौधरी, विलास सहानी, सरोज चौधरी, शिवकुमार जमना विंद, विजय सहानी, वकील मिश्री सहानी, सजिवन घुरुल बिन, छोटक हरेराम बिन, अर्जुन विलासराव श्रीरसागर (मालक), शंकर पवार (मालक), राजकुमार सोनटक्के (मालक), नारायण पुंड (मालक), रामदास क्षिरसागर (मालक), पपन क्षिरसागर (मालक), शिवाजी हंबर्ड (मालक), पुंडलीक सोनटक्के (मालक), कैलाश क्षिरसागर (मालक) व बालाजी हंबर्ड (मालक) यांच्याविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. यातील काही आरोपी बिहार, उत्तर प्रदेश येथील असून मालक आरोपी नांदेड जिल्ह्यातील आहेत.